# INDIAN DEMOCRACY & WOMEN'S POLITICAL PARTICIPATION





EDITOR

DR. AVINASH B. MOHARIL

DR. PRAVIN J. GULHANE

# Index

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)



| S.No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>तोष्णा बी. बोंदाडे | 1 |
| 2 | भारतीय लोकशाहीत स्त्रियांचा राजकीय सहभाग<br>डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे | 11 |
| 3 | बेन्च मापडर्कग पध्दतीव्दारे, लोकशाहीतील महिलांचा सर्वोच्च संवैधानिक पदावरील सहभाग – एक अभ्यास<br>प्रा. उमेश वी. बेलोरे | 24 |
| 4 | महिला राजकीय सहभाग (विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य)<br>प्रा. डॉ.आंधळेबी.व्ही. | 42 |
| 5 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>कु.प्रीती रविंद्र पांडे | 48 |
| 6 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>नादरगे चंद्रदीप बालाजी | 53 |
| 7 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>डॉ.रेखा ताराचंद झलके | 58 |
| 8 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा.डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी | 63 |
| 9 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग<br>कु. अर्चना शंकर जयस्वाल | 73 |
| 10 | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकिय सहभाग<br>प्रा.प्रमोदिनी ज्ञा.खोरगडे (सातंगे) | 79 |
| 11 | भारतीय लोकशाहीतील राजकीय सहभाग : एक सामाजिक मानसिक दृष्टिकोन<br>डॉ. ज्योती जे.नागपुरकर | 82 |

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

# महिला राजकीय सहभाग
## (विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य)

प्रा. डॉ.आंधळेबी.व्ही.

राज्यशास्त्र विभाग के.रमेशवरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणीमो.नं. ९४२३४७२७५५ ईमेल:- bvandhale@gmail.com

---

**प्रस्तावना :-**भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखलीजाते.देशातील ९० कोटीमतदार मतदानाचा हक्क बजावून आपले प्रतिनिधी निवडतात. यात स्त्रियांचा वाटा हा सुद्धा जवळपास ५०% इतका आहे. काही घटक राज्याततर तो पुरुषांपेक्षा अधिक आहे. परंतु संसदेतील प्रतिनिधीत्व आणि विधानसभेतील प्रतिनिधीत्व अभ्यासले तर ते २०% टक्क्यांपेक्षा अधिक नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात कधीच महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळालेनाही . पण भारतीय राजकारणात इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, जयललिता, सोनिया गांधी,सुस्मास्वराज,मायावतीवममता बॅनर्जी यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. तसेच आज विविध क्षेत्रात महिला आपल्या कार्याचा त्याचा उमटवत आहेत .स्त्री- पुरुष समानता, महिला सबलीकरण, स्त्रीवाद यासारख्या विविध संकल्पना आजत्यामुळे पुढेआल्या आहेत.२१ व्या शतकातील महिला ही पुरुषांच्या बरोबरीने निर्णयघेऊशकते.हेवेळोवेळी सिद्ध झाले आहे.

महाराष्ट्र हे तर इतर राज्याच्या तुलनेत पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे थोर महिला समाज सुधारक महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांनी महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रातील स्त्रियांना एक बळ मिळाले .यामुळेच आजमहाराष्ट्रात मेधा पाटकर, लता मंगेशकर, माधुरी दीक्षित, सिंधुताई

सपकाळ, सुरेखा पुणेकर ,नीलम गोरे,मिरा बोरवणकर,सुचित्रा महाजन, सुप्रिया सुळे, पंकजा मुंडेवतृप्ती देसाई यासारख्या महिला आपापल्या क्षेत्रात आज यशस्वीपणे कार्य करत आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विविध पदांवर ५०% महिला काम करताना दिसून येतआहेत.परंतूमहाराष्ट्र राज्यातमहिलांचाराजकीय सहभाग नेमकाकसा आहे हे अभ्यासावेलागेल.

**संशोधनाचीउद्दिष्टे:-** प्रस्तुत शोध निबंध लेखन करण्यासाठी पुढील काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) महाराष्ट्र राज्यातील महिलांचाराजकीय सहभाग अभ्यासणे.

२) महिला राजकीय सहभागाचाअभ्यास करून निष्कर्ष काढणे.

३) महिला राजकीय सहभाग वाढावा म्हणून उपाय सुचविणे.

**शोधनिबंधाचीव्याप्ती व मर्यादा:-**प्रस्तुत शोध निबंधाचीव्याप्ती हीमहाराष्ट्रातीलविधिमंडळ महिला राजकीय सहभाग या विषयापुरतीआहे.तसेच१९६२ते २०१९या विधानसभेतील मतदान वमहिला प्रतिनिधित्वआकडेवारीच्या आधारे निष्कर्ष काढलेजातील.

**संशोधनाची गृहितके:-**प्रस्तुत शोध निबंधाची गृहितके पुढीलप्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्र राज्यातील महिलांचा राजकीय सहभाग अत्यल्प आहे.

२) राजकीय सहभाग वाढविण्यासाठी विशेष तरतूदींचीआवश्यकता आहे.

३) महिला राजकीय सहभाग संख्यात्मकव गुणात्मकअसलापाहिजे.

**महाराष्ट्र** विधिमंडळ आढावा :-महाराष्ट्र राज्यविधिमंडळातराज्यपाल, विधानसभा, विधान परिषद यांचा समावेश होतो. विधान परिषदहे स्थायी व वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाची सभासद संख्या ७८ एवढी आहे. यात विविध क्षेत्रातून १२ सदस्य नेमण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. विधानसभा हे महाराष्ट्र राज्याचे कनिष्ठ सभागृह आहे. ज्याची सभासद

Late.Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sopneth Dist.Parbhani (M.S.)

संख्या २८८ एवढी आहे. यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून प्रौढ मताधिकारातून केली जाते. या सभागृहाचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून आजपर्यंत विधानसभेच्या एकूण १३ सार्वत्रिक निवडणूक झाल्या आहेत. या निवडणुकांमध्ये विविध राजकीय पक्ष आपले उमेदवार उभे करून निवडणूक लढवतात. महाराष्ट्र विधानसभेमध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळते तो राजकीय पक्ष आपली सत्ता स्थापन करतो. महाराष्ट्र राज्य विधानसभेचीपहिली सार्वत्रिक निवडणूक १९६२ मध्ये झाली. या निवडणुकीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला बहुमत मिळाले आणि यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पहिले सरकार स्थापन झाले. या निवडणुकीत एकूण १३ महिला निवडून आल्याहोत्या. तर २०१९ च्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत २४ महिलाप्रतिनिधी निवडून आल्या आहेत. महाराष्ट्र मतदारांचा संख्यात्मक विचार करता महिला आणि पुरुष मतदार अशी ५० टक्के एवढी मतदारसंख्या आहे. तसेच मतदान प्रक्रियेत सुद्धा पुरुष मतदान टक्केवारीच्या निम्म्यामहिला मतदानचा हक्क बजावतात. गेल्या १३ सार्वत्रिक निवडणूका मधीलमहिला -पुरुष मतदानटक्केवारी दर्शवणारा तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**महाराष्ट्र राज्य विधानसभेतील पुरूष–महिलामतदानटक्केवारीदर्शवणार**

| अ.क्र. | निवडणूक वर्ष | पुरूष मतदान % | महिला मतदान % | एकुण मतदान % |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९६२ | ६७.७१ | ५४.५१ | ६०.३० |
| ०२ | १९६७ | ६९.२२ | ६०.२५ | ६४.८४ |
| ०३ | १९७२ | ६४.६९ | ५६.३८ | ६०.६३ |
| ०४ | १९७८ | ७०.४९ | ६४.५५ | ६७.५९ |
| ०५ | १९८० | ५८.०७ | ४८.२८ | ५३.३० |
| ०६ | १९८५ | ६२.०१ | ५६.१७ | ५९.१७ |
| ०७ | १९९० | ६५.१९ | ५९.०८ | ६२.२६ |
| ०८ | १९९५ | ७२.६८ | ७०.६४ | ७१.६९ |
| ०९ | १९९९ | ६३.६२ | ५८.०३ | ६०.९५ |
| १० | २००४ | | | ६३.४४ |
| ११ | २००९ | ६१.५५ | ५७.२३ | ५९.५० |
| १२ | २०१४ | ६४.३३ | ६१.६९ | ६३.०८ |
| १३ | २०१९ | ६२.७७ | ५९.२६ | ६१.०१ |

Late Ramesh Warpudkar Arts Commerce & Science College, Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**महाराष्ट्र राज्य विधानसभेतील महिला प्रतिनिधित्वदर्शवणारातक्त**

| अ.क्र. | निवडणूक वर्ष | एकुण जागा | निवडणूक लढविलेल्या जागा | निवडून आलेल्या जागा | एकुण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १९६२-६७ | २६५ | ३६ | १३ | ४.९० |
| ०२ | १९६७-७२ | २७१ | १९ | ०९ | ३.३२ |
| ०३ | १९७२-७७ | २७१ | ५६ | ०० | ०.०० |
| ०४ | १९७८-८० | २८८ | ५१ | ०८ | २.७७ |
| ०५ | १९८०-८५ | २८८ | | १९ | ६.५६ |
| ०६ | १९८५-९० | २८८ | | १६ | ५.५५ |
| ०७ | १९९०-९५ | २८८ | १४७ | ०६ | २.०८ |
| ०८ | १९९५-९९ | २८८ | २४७ | ११ | ३.८१ |
| ०९ | १९९९-०४ | २८८ | ८६ | १२ | ४.१६ |
| १० | २००४-०९ | २८८ | १५८ | १२ | ४.१६ |
| ११ | २००९-१४ | २८८ | २११ | ११ | ३.८१ |
| १२ | २०१४-१९ | २८८ | २७७ | २० | ६.९४ |

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

वरील दोन्ही तक्त्यांचासंशोधनात्मक अभ्यास करता असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या सर्व विधानसभा निवडणुकीत महिलांचा मतदानातीलराजकीय सहभाग पुरुषांच्या तुलनेत जवळपास बरोबर आहे. दोन ते तीन टक्के एवढीच मतदान टक्केवारी पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. परंतु विधानसभेतील प्रतिनिधित्व याचा महिला-पुरुष असा तुलनात्मक अभ्यास करता असे दिसून येते की पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रतिनिधित्व अत्यंतकमी आहे. तेदोन अंकी आकडेवारी पर्यंत सुध्दा गेले नाही.केवळ मतदान करणे हा राजकीय सहभाग होत नाही तर कायदेमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळणे आणि निर्णय प्रक्रियेत महिलांना सामावून घेणे हा महिलांचा राजकीय सहभाग होऊ शकतो. महाराष्ट्र विधानसभेमध्ये आजही १० टक्क्यांपेक्षा अधिक महिला प्रतिनिधित्व मिळाले नाही. हीच परिस्थिती भारतातील इतरही राज्यांची व भारतीय संसदेची आहे. सध्याच्या लोकसभेत जेमतेम ५७म्हणजे १४.३% महिला खासदार निवडून आलेल्या आहेत तर राज्यसभेत २५ महिला प्रतिनिधी आहेत.

**निष्कर्ष वउपाय :-** महाराष्ट्र हे एक पुरोगामी व विकासात्मक राज्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना 33% आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. आज महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्था मधील विविध पदांवर ५० टक्के आरक्षण महिलांनादेण्यात आलेले आहे. परंतु महाराष्ट्र विधिमंडळात महिलांचे प्रतिनिधी हे अजूनही म्हणावे तसे वाढलेले नाही.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत २३९ महिलांनी निवडणूक लढवलीहोती पण यातील केवळ २४ महिला निवडून आल्या. यातील १८९ महिलांची अनामत रकमा सुद्धा जप्त झाली आहे.आजही महाराष्ट्रात महिलांना पुरुषांच्या तुलनेत बरोबरीचे स्थान देण्यात आलेले नाही . म्हणून येणाऱ्या काळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे आवश्यक आहे.

यासाठीसंसदेत कायदा करून महिलांना आरक्षण दिले पाहिजे.तसेचराजकीय पक्षांनीमहिलांना अधिक तिकीट दिले पाहिजेत.यासाठीनिवडणूक आयोगाने राजकीय पक्षांनाबंधन घातले पाहिजे.

आज महाराष्ट्राचे राजकारण हे विविध राजकीय आघाड्यानी बरबटले आहे. या अनैतिक आघाड्या सत्तेसाठी आसुसलेल्या आहेत.महिलांचाराजकीय सहभाग वाढविण्यासाठी आजकोणत्याचराजकीय पक्षांची इच्छाशक्तीदिसून येत नाही.तेव्हा येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महिलांना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी समाजातील सर्व घटकांनीआग्रह धरणेआवश्यक आहे. तरचमहिलांचा राजकीय सहभाग वाढेल.

**संदर्भ सुची:-**


१) महिला अधिकारऔर मानवअधिकार –महरोत्राममता

२) संसदीय व्यवस्था मेंपरिवर्तन कीदिशा –इंदासिंह उम्मेद

३) महाराष्ट्र शासन आणि राजकारण – प्रा.मोरेविठ्ठल

४) www.loksatta.com

५) www.wikipidea.com

६) साधना साप्ताहिक

७) प्रबोधन पत्रिका

८) महाराष्ट्राचेराजकारण व शासन – डॉ . गाठाळ एस.एस.

९) महाराष्ट्राचेराजकारण – पळशीकर सुहास

१०) भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल –पवार प्रकाश


Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sopneth Dist.Parbhani (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani